**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. अभयकुमार बाबुराव बरगाले
१६/७०, राजाराम रोड, इचलकरंजी, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
कोल्हापूर, महानगरपालिका, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा
१. सहाय्यक संचालक, नगर रचना, कोल्हापूर,
कोल्हापूर, महानगरपालिका, कोल्हापूर
२. उपशहर अभियंता, वि.का.क्र.२,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर — उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५२ / २००९ /कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.२०.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. अभयकुमार बाबुराव बरगाले<br>१६/७०, राजाराम रोड, इचलकरंजी, जि. कोल्हापूर<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,<br>कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. गणेश देशमुख<br>**१. जन माहिती अधिकारी** तथा १. सहाय्यक संचालक,<br>नगर रचना, कोल्हापूर, महानगरपालिका, कोल्हापूर<br>श्री. मधुकर यशवंत देवडे<br>२. उपशहरअभियंता, वि.का.क्र.२,कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.१.२००९,<br>१०.२.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.३.२००९ -- |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोड़पत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

आपण पाच मुद्दयांची माहिती मागितली होती. त्यातील दोन मुद्दयांची माहिती अपिलीय प्राधिकारी यांनी आदेश देऊनही मिळाली नाही. धारिका अवलोकनासाठी दिल्या नाहीत. रस्त्याची मानके आपल्या मागणीनुसार मिळावीत. लेआऊट मंजुरीच्या आदेशानंतर दोन दिवसांत त्यात बदल केले. त्याबाबतच्या परिपत्रकाची प्रत मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. अभयकुमार बाबुराव बरगाले यांनी केले.

अपीलकर्ता श्री. अभयकुमार बाबुराव बरगाले यांना आवश्यक त्या धारिका पाहणीसाठी दिल्या, तसेच अभिलेखातील उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती पुरविल्या. रस्त्याची मानके, शासकीय मंजुरी आदीबाबतच्या वस्तुस्थितीचे स्पष्टीकरण केले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाययक संचालक, नगर रचना, कोल्हापूर महानगरपालिका, श्री. मधुकर यशवंत देवडे व अपिलीय प्राधिकारी तथ उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. गणेश देशमुख यांनी केले.

अपीलकर्त्यास दोन मुद्दयांची माहिती विसंगत मिळाली होती. धारिका दाखवून दुरूस्त माहिती देण्यात आली, असे अपिलीय प्राधिकारी उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. गणेश देशमुख यांनी नमूद केले.

अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास सर्व संबंधित धारिका त्वरित अवलोकनासाठी उपलब्ध करून द्याव्यात व त्यातील आवश्यक त्या प्रती नि:शुल्क द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. .३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सतिश नरसू मोरे
सिध्दार्थनगर, मु.पो.पेठ वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५३ / कोल्हापूर / २००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सतिश नरसू मोरे
सिध्दार्थनगर, मु.पो.पेठ वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.समीर शिंगटे

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.रणजित देसाई

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.२.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.३.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

पुरवठा विभागाकडील आपण मागितलेली माहिती देण्यासाठी रूपये २५००० शुल्क जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी कळविले. सहा. जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.कोळी यांनी संचिका पाहण्यासाठी उपलब्ध करून दिल्या नाहीत. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी आदेश देऊनही श्री.कोळी यांनी माहिती देण्यास नकार दिला. त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सतिश नरसू मोरे यांनी केली.

श्री.मोरे यांना माहिती देण्यात आली नाही, ही वस्तुस्थिती आहे. श्री.पी.एस.कोळी सहा.जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, हातकणंगले, जि.कोल्हापूर असून सूचना देऊनही ते माहिती देत नाहीत, माहिती-मागणीच्या अर्जाची पोहोचही देत नाहीत. यापूर्वीही त्यांना सात-आठ नोटिसा दिल्या आहेत. माहिती न दिल्याबद्दल त्यांना खुलासाही मागितला. परंतु त्यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यांनी माहिती न दिल्यामुळे अपीलकर्त्यास शुल्काबाबतचे स्पष्टीकरण देण्यासाठी श्री.कोळी यांना सांगितले होते, परंतु त्याचा तपशील त्यांनी दिला नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री.रणजित देसाई यांनी केले.

श्री.मोरे दारिद्र्यरेषेखाली असल्याने त्यांना कळविलेल्या शुल्काबाबत व एवढ्या रकमेची माहिती नि:शुल्क देण्यासाठी शासनाकडे मंजुरी घेणे आवश्यक असून पुरवठा प्रशासन/पुरवठा अव्वल कारकून यांच्याकडून प्रमाणपत्र न आल्याने शासनाकडून त्याबाबतची आर्थिक तरतूद होताच आपल्याला माहिती देण्यात येईल, असे श्री.मोरे यांना कळविले. श्री.मोरे यांना अभिलेखाचे अवलोकन करून आवश्यक त्या प्रती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी दिला होता. त्यानुसार श्री.कोळी यांना निर्णयाची प्रत देण्यात आली होती. तथापि त्यांनी याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, असेही जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.रणजित देसाई यांनी लेखी नमूद केले.

दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती, अंत्योदय रजिस्टर आदी मिळून १२८४ प्रती होतात. त्यामुळे २५६८४ रूपये शुल्क कळविले. त्या पत्रावर श्री.मोरे यांनी कोणतेही उत्तर दिलेले नाही, असे सहा.जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.कोळी यांनी सांगितले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.रणजित देसाई यांनी पुरवठा अव्वल कारकून, हातकणंगले तहसील कार्यालय, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.कोळी यांना माहिती देण्याबाबत वारंवार सूचना दिल्याचे दिसते. तसेच शुल्काबाबतचे स्पष्टीकरण / प्रमाणपत्र सादर करण्यासही लेखी दिले आहे. तथापि श्री.कोळी यांनी याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही, असे स्पष्ट होते. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांच्या निर्णयाची प्रतही श्री.पी.एस.कोळी यांना माहितीसाठी व जरूर त्या कार्यवाहीसाठी पृष्ठांकित केली अहे. तथापि त्यानुसार श्री.कोळी यांनी कार्यवाही केलेली नाही व त्याबाबत कोणतेही स्पष्टीकरणही त्यांनी दिलेले नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(४ व ५) अन्वये श्री.कोळी जन माहिती अधिकारी

ठरतात व उपरोक्त सर्व बाबी लक्षांत घेता माहिती न देण्यास जबाबदार म्हणून ते शास्तीस पात्र ठरतात.

अपीलकर्ता श्री.सतिश नरसू मोरे दि.२६.६.२००९ रोजी संबंधित संचिका पाहण्यासाठी कार्यालयात येतील. त्यांना संचिका दाखवून आवश्यक असलेल्या १०० पानापर्यंत कागदपत्रांच्या प्रती नि:शुल्क द्याव्यात. या कार्यवाहीबाबत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापि असा अहवाल आयोगाला अद्याप प्राप्त झालेला नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) सहा.जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, हातकणंगले तहसील कार्यालय, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.कोळी यांनी माहिती दिली नाही. तसेच माहिती देण्याबाबत कोणतीही कार्यवाही न करणे हे माहिती नाकारणे आहे. त्याबद्दल श्री.कोळी यांना रूपये २५००० शास्ती करण्यात येत आहे. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी श्री.पी.एस.कोळी, सहा.जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, तहसीलदार कार्यालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांच्या एप्रिल २०१०, मे २०१० व जून २०१० या महिन्यांत मिळणाऱ्या अनुक्रमे मार्च २०१०, एप्रिल २०१० व मे २०१० च्या वेतनातून तीन हप्त्यात ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी. तसेच महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार शास्तीची नोंद घेण्याची कार्यवाही करून त्याचा अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १८ .३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. महादेव पिराज़ी सासणे
मु.पो.शिरढोण, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
विस्तार अधिकारी, पंचायत
समिती, शिरोळ, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा
ग्रामसेवक, ग्रामपंचायत
शिरढोण, ता. शिरोळ,
जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५४/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.२.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, शिरढोण, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर श्री. वाय. के. जाधव<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत शिरढोण, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर श्री. व्ही. व्ही. गावडे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.३.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.३.२००९ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती पाच दिवस विलंबाने दिली, म्हणून त्यांना शास्ती व्हावी. शासनाच्या घरकुल योजनेत अतिक्रमणाच्या कारणावरून आपल्याला लाभ दिला नाही. मात्र अन्य व्यक्तींना लाभ दिला आहे, असा भेदभाव का, याची माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. महादेव पिराजी सासणे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केले आहे.

श्री. सासणे यांचा अर्ज दि. १३.२.२००९ चा असून दि. ७.३.२००९ रोजी रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. तीन दिवस त्यांनी ती न स्वीकारल्याची नोंद आहे. त्यांनी ती दि. १७.३.२००९ रोजी स्वीकारली. या विलंबाला जन माहिती अधिकारी जबाबदार नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत शिरढोण, ता. शिरोळ श्री. व्ही. व्ही. गावडे व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, शिरोळ, ता. शिरोळ श्री. वाय. के. जाधव यांनी टपालाच्या संबंधित कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्याची विलंबाबाबतची तक्रार रास्त नाही. घरकुल योजनेतील भेदभावाची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. .३.२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अरुण विश्वनाथ कारीकर
६८/बी १, बी.यु.भंडारी स्कायलाईन,
दत्तनगर, दिघी,
पुणे-४११०१५ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
शिरुर, जि. पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
शिरुर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५६/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०/१०/२००९ |
| ३ | प्रथम अपिलांची तारीख | दि. ७/१२/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** वैद्यकीय बिल मजूंर न केल्याबाबतची कारणे, तसेच वैद्यकीय बिलाची रक्कम केव्हा मिळेल या बाबतचा खुलासा | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अरुण विश्वनाथ कारीकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतच्या कागदपत्रांवरुन त्यांनी मूळ माहिती - मागणी अर्जान्वये केलेली मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. या अधिनियमातील तरतुदीनुसार खुलासा, भाष्य, भविष्यकालीन संभाव्य कार्यवाही याची मागणी 'माहिती' म्हणून करता येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्त्याच्या वैद्यकीय बिलाच्या मजुंरी संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरुर, जि. पुणे यांनी आठ दिवसांत अपीलकर्त्यास देऊन त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. संजय विजय भिडे
११११/१ उत्तर शिवाजीनगर,
कै.विष्णू विनायक भिडे मार्ग,
गणपती गॅस गोडावून जवळ,
सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त(प्रशा.),**
नाशिक विभाग, द्वारका सर्कल,
नाशिक-११

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा स्वीय सहायक,**
विक्रीकर सहआयुक्त,
नाशिक

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५८/२००९/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६/०७/२००६ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०/०९/२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१२/१०/२००६ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** आर्थीक वर्ष १९९६-९७ ते २००५-०६ या कालावधीत नाशिक महानगरपालिका क्षेत्रातून व्यवसाय करातून मिळालेल्या उत्पन्नाचा वर्षनिहाय तपशील | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. संजय विजय भिडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिल दाखल केले होते. दरम्यानच्या काळात अपीलकर्ता श्री. भिडे यांचे दि.२८/०१/२०१० रोजी निधन झाल्याबद्दलचा दि.२६/०३/२०१० रोजीचा मृत्यू दाखला सक्षम प्राधिकारी, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी आयोगास सादर केलेला आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. ज्ञानोबा तावरे व श्रीमती स्वाती तावरे
१२६३/२, फ्लॅट नं.७, गोकुळेश अपार्टमेंट,
सुभद्रा हॉटेल कपौंड, जंगली महाराज रोड,
पुणे-४ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी**
पुणे महानगरपालिका (उद्यान विभाग),
पुणे-५

**जन माहिती अधिकारी तथा वृक्ष अधिकारी,** **उत्तरवादी**
पुणे महानगरपालिका,
पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५८ /२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४/१२/२००९ |
| ३ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. ज्ञानोबा तावरे व श्रीमती स्वाती तावरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 29 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. बाळासाहेब निवृत्ती चौधरी
मु. पो. नरखेड, ता. मोहोळ,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
अधिक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
सोलापूर पाटबंधारे विभाग,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६८/२०१०/सोलापूर |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८/१/२०१० |
| ३ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५/२/२०१० |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** माहिती - मागणीच्या अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. बाळासाहेब निवृत्ती चौधरी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ व जन माहिती अधिकारी यांचे उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 2 9 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती सावित्रा विठ्ठल पवार
मु. पाटीलवाडी (रुवले),
पो. सणबूर, ता. पाटण,
जि. सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**१) जन माहिती अधिकारी,**
एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी,
पाटण, जि. सातारा

**२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
सरस्वती विद्यालय रुवले,
ता. पाटण, जि. सातारा **उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६९/२०१०/सातारा |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.९/७/२००९, २४/८/२००९, २७/८/२००९ |
| ३ | **मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती :-** सरस्वती विद्यामंदीर रुवले मध्ये शिकत असणारी विद्यार्थीनी सौ. मालन बाबू कोळेकर (साळुंखे) यांच्याबाबतची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती सावित्रा विठ्ठल पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत आवश्यक शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेली नाही तसेच एकापेक्षा जास्त माहिती - मागणी अर्जासाठी एकत्रितपणे अपील केलेले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्रपणे अपील करणे आवश्यक आहे. सबब अपीलकर्त्या श्रीमती पवार यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 29 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. जुल्फीकार अय्युब सय्यद
८१, लोकमान्यनगर, होटगी रोड,
मजरेवाडी, सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.),**
जिल्हा परिषद, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** **उत्तरवादी**
महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७१ /२०१०/सोलापूर |
| २ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. जुल्फीकार अय्युब सय्यद यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे आणि आवश्यक शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 29 MAR 2010

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. धर्मराज देवबा साठें आणि
श्री. संजय दिनकर मगर
मु.पो. मगराचे निमगांव,
ता. माळशिरस, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**१) अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी,**
सोलापूर

२) अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर

**१) जन माहिती अधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

**उत्तरवादी**

**२) जन माहिती अधिकारी,**
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७२/२०१०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११/८/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६/११/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती :-**<br>मौजे मगराचे निमगांव येथील ग्रामपंचायतीचे रेकॉर्ड गहाळप्रकरणी चौकशी होऊन अहवाल मिळणेबाबत | |

## विवेचन

अपीलकर्ता धर्मराज देवबासाठे व संजय दिनकर मगर यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती - मागणी अर्जासाठी एकत्रितपणे अपील केलेले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्रपणे अपील करणे आवश्यक आहे. सबब अपीलकर्ता श्री. साठे व मगर यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 29 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. दत्तात्रय दिनानाथ साळी
वृंदावन हौसिंग कॉम्प्लेक्स,
से.डी.फ्लट-बी-१३, पौड रोड,
कोथरुड, पुणे-३८

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव ,**
राज्य माहिती आयोग,
पुणे खंडपीठ, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
राज्य माहिती आयोग,
पुणे खंडपीठ, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७३/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०/११/२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०/१२/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११/०१/२०१० |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६/०२/२०१० |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** आयोगाकडील अपील क्र.५६०/२००९/पुणे प्रकरणी आयोगाच्या आदेशानुसार कार्यवाही न केल्याबद्दल संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लागू करण्याचे अधिकार कोणास आहेत, शास्ती लागू करु नये म्हणून अपील करता येते काय, याबाबतची तरतूद काय आहे, सदर अपिलात शास्ती का लागू करण्यात आली नाही, शास्ती लागू करण्यासाठी कोणाकडे व कशा प्रकारे अर्ज करावा, इ. खुलासेवजा माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय दिनानाथ साळी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग यांनी दिलेले उत्तर, तसेच अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ यांचा निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुरज विजय खोपडे
मु. पो. आसले,
ता. वाई, जि. सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सरव्यवस्थापक,** **उत्तरवादी**
सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित,
सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७४ /२०१०/सातारा |
| २ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. सुरज विजय खोपडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 29 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. जगन्नाथ शंकर होळकर
मु.पो. होळ (सदोबाची वाडी),
ता. बारामती, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**१) अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
बारामती, पुणे

**२) अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
पुणे

**उत्तरवादी**

**१) जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय बारामती, जि. पुणे

**२) जन माहिती अधिकारी ,**
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७६/२०१०/पुणे |
| २ | **मूळ माहिती मागणी अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही.** | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. जगन्नाथ शंकर होळकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच त्यांनी आयोगाकडे केलेले अपील हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदी अन्वये विहित केलेल्या ९० दिवसांच्या मुदतीत केलेले नसल्याने मुदतबाहय आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुभाष नामदेव साळुंखे
मु.व्यंकोचीवाडी, पो.शिपूर,
ता.मिरज, जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (इ. व द.),**
पंचायत समिती;
मिरज जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६८१/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८/०३/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९/०३/२००८, २२/०४/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३/०७/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०/०७/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००६-०७ व २००७-०८ मध्ये प्राथमिक आरोग्य उपकेंद्र एरंडवलीच्या इमारत दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक व झालेल्या खर्चाचे अंतिम देयक | |

<u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.११/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता श्री. सुभाष नामदेव साळुंखे यांना माहितीसाठीचे आवश्यक शुल्क रु.७४/- चा शासकीय कोषागारात भरणा करुन माहिती प्राप्त

करुन घेण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी दि.२९/०३/२००८ च्या पत्रान्वये कळविले होते. तथापि त्यांनी शुल्काचा भरणा केला नाही, तरीही दि.२२/०४/२००८ च्या पत्रासोबत त्यांना माहिती पाठविण्यात आली असल्याचे, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (इ. व द.), पंचायत समिती, मिरज व अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी प्रपत्रात व त्या सोबत सादर केलेल्या निवेदनात नमूद केले . उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. संजय विजय भिडे
१११९/१, उत्तर शिवाजीनगर,
कै.विष्णु विनायक भिडे मार्ग,
गणपती गॅस गोडावून जवळ,
सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त,**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता,**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६८९/२००९/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६/०३/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०/५/२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६/०६/२००९ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेमार्फत 'एफबीटी' तत्वावर विकसित करण्यात येत असलेल्या व्यापार संकुलाबाबत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.संजय विजय भिडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले होते. दरम्यानच्या काळात अपीलकर्ता श्री.भिडे यांचे दि.२८/०१/२०१० रोजी निधन झाल्याचे दिं.२६/०३/२०१० रोजीच्या मृत्यू दाखल्यासह सक्षम प्राधिकारी, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 31 MAR 2010